त्रैमासिक

# उन्नयन

किंमत : ६० रुपये

संपादक : सुनील रेगे

वर्ष पाचवे अंक ४ (ऑक्टोबर - डिसेंबर २००६) मुंबई



श्री. भवरलाल जैन



श्री. उन्मेष जोशी

To,
Subhash
Pawar

दीपावली विशेषांक



श्री. प्रभाकर देवधर

## व्यक्तिमत्त्व विकासाची गुरुकिल्ली

# सर्वांगाने बहरलेला वाकोदचा वटवृक्ष



श्री. भवरलाल जैन

सुनील रेगे

काही वर्षांपूर्वी उन्नयनने आयोजित केलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी उन्नयन शब्दाचा अर्थ विस्ताराने विषद केला होता. माणसाची उन्नती होणे म्हणजे त्याचे उन्नयन होणे. इथे उन्नती आणि प्रगती या दोन वरवर समानार्थी भासणाऱ्या शब्दातील अर्थांचा फरक जाणून घेणे आवश्यक आहे. केवळ आर्थिक दृष्टया वरच्या स्तरावर जाणे, सुबत्ता मिळवणे याला प्रगती झाली असं संबोधलं जातं. परंतु उन्नती शब्दाला अशा प्रकारच्या आर्थिक प्रगतीबरोबरच आणखी एक परिमाण लाभतं ते अध्यात्मिक, वैचारिक दृष्टीकोनाचं. उन्त्ती झालेल्या म्हणजेच उन्नयन झालेल्या व्यक्तीचं जीवन सर्वांगानं उन्नत झालेलं असतं, परिपक्व झालेलं असतं.

आयुष्यात आपल्याला प्रगती झालेले म्हणजेच आर्थिक दृष्टया प्रगत झालेले आणि या प्रगतीच्या बळावर ऐहिक सुखांचा उपभोग घेणारे अनेक महाभाग भेटतात. परंतु आर्थिक प्रगतीबरोबरच पारमार्थिक सुखाचा आनंद उपभोगणारे गुणीजन अगदी अभावानेच भेटतात. अलीकडेच अशाच एका गुरुतुल्य यशस्वी उद्योजकाची भेट घेण्याचा योग जुळून आला. स्वत:च्या असमान्य कर्तृत्त्वाचा बळावर या महोदयांनी एकप्रकारचं औद्योगिक साम्राज्यच उभं केलं आहे. परंतु विशेष नोंद घेण्याजोगी बाब म्हणजे हे औद्योगिक साम्राज्य उभारताना त्यांनी त्याला सद्वर्तनाची, प्रामाणिकपणाची बैठक प्राप्त करुन दिली आहे. या उद्योगमहर्षीचं नाव श्री. भवरलालजी जैन. जळगाव येथील जैन उद्योगसमुहाचे सर्वेसर्वा प्रमुख श्री.भवरलाल जैन यांच्या 'उन्नती'ची कहाणी आज आपण जाणून घेणार आहोत.

जळगाव जिल्हयातील वाकोद या छोटयाशा




उमवि जळगावचे कुलगुरु श्री. माळी यांचेकडून
''डॉक्टर ऑफ लेटर्स'' ही पदवी स्विकारताना

गावात जन्मलेल्या भवरलालजींनी म्हणजेच भाऊंनी प्रतिकूल परिस्थितीत नातेवाईकांचा आधार घेत आपलं शिक्षण पूर्ण केलं. बी-कॉम आणि एल.एल.बी.पदव्या हस्तगत केल्यानंतर त्यांना चांगली सनदी नोकरी करण्याची संधी मिळाली होती. परंतु ती नाकारुन १९६३ मध्ये मातोश्री गौराबाई यांच्याकडून भांडवलासाठी रु. ७०००/- घेऊन त्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरु केला. सुरुवातीला दुचाकी वाहनांची एजन्सी, गॅस सिलिंडरची विक्री, रॉकेलची विक्री, मोटरगाडयांचा सुटया भागांची विक्री असं या व्यवसायाचं स्वरुप होतं.प्रारंभीची वार्षिक दहालाख रुपयांची उलाढाल त्यांनी १९७८ पर्यंत अकरा कोटींच्यावर नेऊन पोहोचवली व जळगाव खानदेशात उत्कृष्ट विक्रेता अशी स्वतःची प्रतिमा निर्माण केली. १९७८ मध्येच भाऊ डिलरशिपमधून मॅन्युफॅक्चरिंगकडे वळले. केळीची पावडर बनविणारा एक आजारी कारखाना त्यांनी विकत घेतला व या कारखान्यात थोडेफार बदल घडवून त्यांनी पपईपासून पपेन बनविण्यास सुरुवात केली. औषधी उद्योग, खाद्यान्न उद्योग, तसेच बिअरमध्ये पपेनचा उपयोग केला जातो. अतिशुद्ध पपेनची निर्मिती करणारा प्रतिस्पर्धी नसल्याने भाऊंच्या पपेनला परदेशातूनही मोठया प्रमाणावर मागणी येऊ लागली. व्यावसायिक कारणांनी सन २००२ पासून हे उत्पादन बंद केले आहे.

पपेननिर्मितीच्या उद्योगात स्थिरावल्यानंतर १९८० मध्ये भाऊंनी पी.व्ही.सी. पाईप तयार करण्याचा कारखाना सुरु केला. आरंभी केवळ तीनशे टन पाईप तयार करणे एवढीच या कारखान्याची वार्षिक क्षमता होती. परंतु चारच वर्षात म्हणजे १९८४ पर्यंत सदर कारखान्यतून दरसाल पंचवीस हजार टन पाईप्सची निर्मिती होऊ लागली! हे पाईप खेडोपाडी पोहोचावेत म्हणून वितरक-विक्रेत्यांचे मोठे जाळेच भाऊंनी उभे केले. व्यवसायाची गणिते सोडविण्यात निष्णात असलेल्या भाऊंनी उत्पादनाला जाहिरातीचीही जोड दिली आणि बाजारपेठ काबीज केली. पाईपच्या जोडीलाच स्क्रीन पाईप आणि केसिंग पाईप असे वेगळ्या प्रकारचे पाईपही जैन कंपनी तयार

करते. यासाठी एका प्रख्यात ऑस्ट्रेलियन कंपनीशी त्यांनी हातमिळवणी केली आहे. जैन-रिबलॉक पाईप असे या संयुक्त उपक्रमाचे नाव आहे. पाण्याबरोबरच कमी दबावाखाली अन्य द्रवरुप पदार्थ वाहून नेण्यासाठी हे वेगळे पाईप उपयुक्त ठरतात.

ठिबक सिंचन प्रकल्पाचा प्रचार हा श्री.भवरलाल जैन यांच्या शिरपेचातीला आणखी एक मानाचा तुरा. पाणी ही बहुमुल्य नैसर्गिक संपत्ती आहे. तिचा विनियोग काटकसरीने होणे ही अत्यंत महत्त्वाची बाब. हे कसे साधता येईल याचा अभ्यास करण्यासाठी भाऊंनी परदेशात खासकरुन इस्त्रायल देशात अभ्यासदौरे काढले व हे तंत्र आत्मसात करुन घेतलं. त्यानंतर यासाठीचे पाईप आणि आवश्यक ते सर्व सुटेभाग जोडलेली संपूर्ण यंत्रणाच त्यांनी विकसित केली. हा प्रकल्प साऱ्या देशभर पोहचविण्यासाठी त्यांनी कंबर कसली आणि अन्य राज्यातही त्यांना उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत गेला. आपल्या देशात विविध प्रकारची फळे पिकतात. मात्र ती नाशवंत असल्याने तत्काळ ग्राहकांपर्यंत पोहोचणे अत्यावश्यक ठरते. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी भाऊंनी फळ प्रक्रिया आणि निर्यात प्रकल्प सुरु केला. याचबरोबर भाज्यांच्या निर्जलीकरणाचा कारखानाही जैन उद्योगसमुहाने जळगावमध्ये सुरु केला आहे.

भाऊंनी जळगावमधील उजाड टेकडयांवर घनदाट वनराई उभी करण्याचा चमत्कारही घडवला आहे. शेतकऱ्यांना शास्त्रीय व तांत्रिक सल्ला उपलब्ध करुन देणे, आवश्यक तेव्हा भांडवल उपलब्ध करुन देणे, दर्जेदार बियाणे व रोपांचा पुरवठा करणे व अशा मार्गदर्शनातून हाती आलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे असा मोठा व्याप जैन उद्योगातर्फे सांभाळला जातो.

करोडो रुपयांची उलाढाल करणाऱ्या भवरलालजींनी सामाजिक उत्तरदायित्व निभावण्यासाठी जैन चॅरिटिजची स्थापना केली आहे. आरोग्य, पर्यावरण, क्रीडा आणि साहित्यिक सांस्कृतिक क्षेत्रात प्राविण्य संपादन करणाऱ्या व्यक्तींना या फाऊंडेशनद्वारे सर्वतोपरी सहाय्य दिलं जातं. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे शारीरिक समस्यांवर मात करुन भवरलालजींनी हा कार्याचा डोंगर उभा केला आहे. दोन वेळा हृदयविकाराच्या गंभीर आजारातून सावरलेले भाऊ दिवसभर जैन उद्योगसमुहाच्या कार्यात आणि आवडीच्या साहित्यिक सांस्कृतिक क्षेत्रात कार्यमग्न असतात.

भाऊंच्या या ओद्योगिक विस्तारामुळे हजारो लोकांना रोजगार मिळाला आहे. अनेक लघुउद्योग, पुरवठादार व अन्य सेवा पुरविणाऱ्या व्यावसायिकांना जैन उद्योगसमुहामुळे काम मिळते. एकूण दहा देशांशी औद्योगिक करार करुन भाऊंनी त्यांच्या उद्योगसमुहाची किर्ती साता समुद्रापार नेली आहे. आजवर त्यांना सन्मानाचे अनेक राष्ट्रीय, आतंरराष्ट्रीय पुरस्कार लाभले असून त्यातील काही निवडक पुरस्कारांची यादी लेखात स्वतंत्रपणे दिली आहे. वाकोदचा वटवृक्ष व वाघूरचं पाणी या दोन पुस्तकांमध्ये भाऊंच्या कार्यावर आधारित लेख व प्रतिक्रीया समाविष्ट करण्यात आल्या असून त्यांच्या वाचनाने आपल्याला भाऊंच्या कार्यजगताची ओळख होते. आजची समाजरचना, तिचे स्वरुप आणि पुनर्बांधणी या ग्रंथालीने प्रकाशित केलेल्या पुस्तकामध्ये भाऊंनी वास्तव परिस्थितीचं, तिच्या कारणांचं मार्मिक चित्रण व विश्लेषण विशद केलं आहे. साहित्यिकांशी व सांस्कृतिक क्षेत्रातील गुणवंतांशी स्नेहाचे नाते जोडणारे भाऊ अन्य काही पुस्तकांच्या लेखनात सध्या मग्न आहेत.

भाऊंच्या कार्याची ओळख करुन घेतल्यानंतर हे सर्व आपण प्रत्यक्षपणे जळगावला भेट देऊन पाहायला हवं असे विचार मनात उमटतात. जळगावला भेट देण्याचा योग येण्याआधीच खुद्द मुंबईतच भाऊंची प्रत्यक्ष भेट घेण्याचा योग जुळून आला. या भेटीमध्ये



कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरु श्री. शंकरराव मगर यांचे हस्ते
''डॉक्टर ऑफ सायन्स'' ही पदवी स्विकारताना

भाऊंचे विचार ऐकल्यानंतर लेखाच्या प्रारंभी म्हंटल्याप्रमाणे त्यांच्या उन्नत व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय आला.

''आपले औद्योगिक साम्राज्य उभे करताना आपल्याला विशेषकरुन कोणत्या गुणांचा आधार मिळाला ?'' या पहिल्याच प्रश्नाचं उत्तर देताना भाऊ म्हणाले-

''कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि इतरांची बाजू समजून घेऊन त्यांच्याशी सुसंवाद साधणे हे तीन गुण मला मुख्यत्त्वे उपयोगी पडले. माझी कार्य संस्कृती श्रमावर आधारित आहे. आजवर आयुष्यात मी अपार कष्ट उपसले असून अजूनही कष्टावर आधारित कार्यपद्धती सांभाळताना मला आनंदच मिळतो. परिश्रमांना प्रामाणिकपणाची जोड दिली की आर्थिक सुबत्तेबरोबरच मानसिक शांतीही लाभते. आपले विचार,उच्चार आणि आचार यांना प्रामाणिकपणाची, शुद्धतेची बैठक असणं आवश्यक आहे. आपण जे बोलतो ते प्रत्यक्षात उतरविण्याची हिंमत अंगी असायला हवी. स्वत:चं डोकं बंद न ठेवता दुसऱ्याचा मुद्दा ऐकून घेणे आणि तो आपल्यापेक्षा योग्य वाटत असेल तर त्याचा स्वीकार करणे हा तिसरा महत्त्वाचा उपयुक्त गुण. अंगी वैचारिक औदार्य भिनवलं की दृष्टी व्यापक होते व आपण आयुष्यात फार मोठी झेप घेऊ शकतो.''

''प्रामाणिकपणाची कास धरायची म्हंटली की अनेकदा निराशाच पदरी पडते. अप्रामाणिकपणाचा मार्ग अनुसरुन व्यवसाय केला की यशाचा शॉर्टकट गाठता येतो अशी अनेकांची धारणा असते. याबाबत आपली प्रतिक्रिया ?''

''प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्यांनी यशाचा मार्ग सापडत नाही म्हणून लगेचच अप्रामाणिकपणाचा, लबाडीचा मार्ग अनुसरण्याची गरज नाही. या समस्येवर उपाय म्हणजे दुप्पट परिश्रम, तीप्पट परिश्रम करण्याची मानसिक तयारी ठेवणे. व्यवसाय म्हंटला की त्यात चढउतार येणारच. मी स्वत: अपयशही पचवलं आहे.. आजवर मलाही अनेक अडचणी आल्या, अनेकदा तोटा सहन करावा लागला. परंतु मी माझ्या निष्ठा बदलल्या नाहीत. लोखंड

## श्री. भवरलाल जैन यांना मिळालेले महत्त्वाचे पुरस्कार



१) **उद्योग विभूषण पुरस्कार :** द्वारा आय.टी.आय.टी.डी. दिल्ली 'एक्सलन्स इन इन्डस्ट्रिअल परफॉर्मन्स (१९९२) हस्ते मा. प्रणव मुखर्जी, डेप्युटी चेअरमन प्लॅनिंग

२) **फाय फाऊंडेशन पुरस्कार :** द्वारा फाय फाऊंडेशन एन.जी.ओ., इचलकरंजी 'इनोव्हेशन इन ॲग्रिकल्चर ॲन्ड मॅनेजमेंट' (१९९५) हस्ते मा. शिवराज पाटील, स्पीकर, लोकसभा

३) **क्रॉफर्ड रिड मेमोरिअल ॲवॉर्ड :** द्वारा इरिगेशन असोसिएशन यु.एस.ए., हस्ते श्री. लुईस टॉथ, अध्यक्ष इरिगेशन असोसिएशन, यु.एस.ए. (१९९७)

४) **वसंतराव नाईक कृषी संशोधन आणि ग्रामीण विकास पुरस्कार :** द्वारा वसंतराव नाईक कृषी संशोधन आणि ग्रामीण विकास प्रतिष्ठान, पुसद (१९९७).

५) **यशोदिप पुरस्कार :** द्वारा आय.इ.आय. नाशिक येथे (२००१) हस्ते श्री. माधवराव चितळे, अध्यक्ष ग्लोबल वॉटर पार्टनरशिप

६) **गांधी आंबेडकर सोशल जस्टिस ॲवॉर्ड :** द्वारा गांधी आंबेडकर फाऊंडेशन फॉर मॉडर्न इंडिया, मुंबई (२००३) हस्ते निवृत्त न्यायाधिश मा. चंद्रशेखर धर्माधिकारी

७) **ॲग्रिकल्चरल टेक्नॉलॉजी रत्न :** द्वारा वायसिटेक्स फाऊंडेशन, मुंबई (२००४) हस्ते वर्गिस कुरियन.

८) **डॉक्टर ऑफ सायन्स :** द्वारा कोकण कृषी विद्यापिठ (२००६) हस्ते डॉ. एस. एस. मगर, कुलगुरु कोकण कृषी विद्यापीठ, दापोली

तापल्याशिवाय पोलाद घडत नाही, हिऱ्याला पैलू पाडल्याशिवाय त्याचं तेज लखलखत नाही. आणि पाण्याला टनेलमधून नेल्याशिवाय त्यातून वीज उत्पन्न होत नाही. कठीण प्रसंगी आपण कसे वागतो त्यातूनच आपलं व्यक्तिमत्त्व विकसित होतं. तपश्चर्येचा मार्ग खडतर असेल परंतु त्यातूनच मनाला खरी शांती लाभते, समाधान लाभतं.

आपले मौलिक विचार मांडताना भाऊंच्या चेहऱ्यावर संतुष्ट भाव उमटले होते. ''आपले आदर्श कोण ?'' या पुढील प्रश्नाला उत्तर देताना भाऊ उद्‌गारले-

''व्यावसायिक क्षेत्रात जे.आर.डी. टाटा, आचार-विचारांसाठी महात्मा गांधी आणि स्वप्ने पाहण्यासाठी, दूरदर्शीपणा अंगी भिनविण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरु. जे.आर.डी. टाटांनी औद्योगिक क्षेत्र उभं केलं ते सचोटीचा पाया रचून. आज शंभर वर्षांनंतरही टाटा उद्योग समुहाबद्दल सर्वांच्या मनात आदर आहे. टाटांचे उत्पादन आहे म्हंटल्यावर ते खरिदताना अथवा त्यासाठी थोडी अधिक किंमत मोजताना ग्राहकाला कसलाही संकोच वाटत नाही. असा विश्वास उभा करता येणं आणि शतकाच्या वाटचालीनंतरही तो टिकवणं ही असामान्य गोष्ट आहे आणि त्यासाठी जे. आर.डी. टाटांना वंदनच करावं लागेल.

महात्मा गांधींच्या विचारांना तर आता जागतिक मान्यता लाभली आहे. मानव जातीच्या इतिहासातील महापुरुष असंच त्यांचं वर्णन करायला हवं. जीवन कसं जगायचं याचा आदर्शच महात्मा गांधींनी आपल्यापुढे ठेवला आहे आणि या आदर्शाचं पालन केलं की आपल्यालाच आत्मिक समाधान मिळतं. पंडित नेहरुंनी मोठी स्वप्ने पाहण्याचा दृष्टिकोन भारतीयांपुढे ठेवला. त्यांनी सुरु केलेल्या योजनांमुळेच भारताला लोकसंख्येच्या समस्येवर मात करुन प्रगतीची दिशा अवलंबिता आली. अशा थोर व्यक्तींचे विचार प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न मी माझ्या आयुष्यात केला आणि त्यामुळेच मला यशाची, समृद्धीची आणि मानसिक शांतीची चव चाखता आली.''

''भावी पिढीला आपण कोणता संदेश देऊ इच्छिता?'' या मुलाखतीच्या अखेरच्या प्रश्नाला उत्तर देताना भाऊ म्हणाले-

''कुठल्याही राष्ट्राचा पाया धर्म असतो. धर्मामुळे संस्कृती उदयाला येते व संस्कृतीचे पालन केल्याने आपण घडतो. जागतिकिकरणामुळे आणि उदारीकरणामुळे मुबलक प्रमाणात उपलब्ध झालेल्या सुखांकडे वळताना युवा पिढीने संस्कृती ही आपली आध्यात्मिक बैठक आहे याचं भान ठेवावं एवढंच मी सांगू इच्छितो. तिच्याशी फारकत न घेता जर त्यांना नव्या सुखचैनींचा आस्वाद घेता आला ते स्वागतार्ह ठरेल अन्यथा घोर निराशाच त्यांच्या पदरी पडू शकते हे त्यांनी ध्यानात ठेवावं एवढंच मी सांगू शकतो.''


आपल्या मुलाखतीत भाऊंनी भारताच्या आजवरच्या वाटचालीत शेतीकडे दुर्लक्ष झाल्याचा मुद्दाही तळमळीने मांडला. या विषयावर पुढील अंकात स्वतंत्र लेख घेण्याचा विचार असल्याने इथे फक्त त्याची नोंद घेण्यात आली आहे. भाऊंचे विचार ऐकणं हा खरोखरच एक अद्वितीय असा अनुभव असतो. पहिल्या भेटीतच आपल्याला एक सच्चा मार्गदर्शक गुरु भेटला अशी भावना आपल्या मनात सहजपणे उमटते. त्यांना सविनय प्रणाम करुन आपण त्यांच्या निवासस्थानातून बाहेर येतो तेव्हा त्यांच्या विचारांची मोहिनी आपल्याला आयुष्यभर साथ देणार आहे याचीही आपल्याला खात्री पटलेली असते. शून्यातून विश्व उभं करण्याऱ्या या वाकोदच्या वटवृक्षाला आदरयुक्त प्रणाम!




'सेतू माधव' प्रकाशन सोहळ्यात डावीकडून श्री. सुनील रेगे, सौ. मीनल मोहाडीकर, डॉ. इरावती भिडे, श्री. माधवराव भिडे, श्री. भवरलाल जैन, श्री. मिलिंद आघरकर आणि श्री. एम. एन. चैनी




सन्माननीय पाहुणे श्री. कुमार केतकर, संपादक दैनिक लोकसत्ता




प्रमुख पाहुणे श्री. भवरलाल जैन



माधवरावांनी आपल्या भाषणात श्रीमती सरस्वतीबाई चिंतामण भिडे चॅरिटेबल ट्रस्ट आणि डॉ. इरावती-माधव प्रतिष्ठान स्थापन करण्याची घोषणा केली